# मोक्ष मिळणे (किंवा मिळवणे)म्हणजे नेमके काय?

डॉ.अश्विनीकुमार पं .धांडे
apdhande17@gmail.com
(मो.) ९८२२४०६९६७



# मोक्ष मिळणे (किंवा मिळवणे)म्हणजे नेमके काय?


## डॉ.अश्विनीकुमार पं .धांडे

**apdhande17@gmail.com**

**(मो.) ९८२२४०६९६७**


**विशेष दक्षता:** ***हा लेख फक्त लेखकाच्या तर्कावर आधारित असुन जगातील कुठल्याही जाती,धर्मावर टिका/टिप्पणी करण्याचा लेखकाची मनीषा नाही. सुज्ञा वाचकांनी केवळ स्वतःच्या तर्काने व विचारशक्तीने याचे वाचन करावे अशी आपणास विनंती.***

**मोक्ष?जीवनाच्या असंख्य (८४लक्ष हिंदू धर्मानुसार )योनीतुन(रूपातून) कायमची मिळालेली मुक्ती!जगातील प्रत्येक व्यक्तीचे एकच लक्ष्य आणि ध्येय.मुळात मोक्षाची व्याख्याच अशी आहे कि मनुष्याचा आत्मा हा अनंतात विलीन होणे.कोठे तर यालाच स्वर्ग,नर्क,जन्नत,जहन्नुम,हेल अथवा हेवन मध्ये जाणे,असे संबोधले जाते.मनुष्य अनंतात विलीन होतो म्हणजे नेमके काय होते तर मनुष्यात असलेली आत्मारुपी शक्ती (किंवा ऊर्जा) विश्वात विरघळून जाते याचाच अर्थ मुक्त होते.**

**माझ्या मते मुळात आत्मारुपी शक्ती म्हणजे शरीरात असलेली जाणीव आहे जी सर्व जिवंत प्राण्याच्या शरीरात प्रत्येक भागात आहे. व आपल्या जिवंतपणाचे लक्षण आहे. आत्मा जर नसेल तर शरीर मृत ठरते कारण त्यात जाणीव नसते.हि जाणीव मनुष्याच्या शरीरात प्रत्येक भागात आहे.जसे हातापायाला काही टोचले तर ताबडतोब जाणीव होते व तेथे क्षणात लक्ष जाते,याच गोष्टी दिसण्याला,गंधाला,ध्वनीला देखील लागू आहेत.याचाच अर्थ हि संवेदना शरीरातील प्रत्येक भाग व्यापून आहे. आत्म्याचे शरीरात असणे हे देखील हे देखील ठरावीक कालमर्यादेपेक्षा ज्यास्त नसते.याला अपवाद फक्त तीव्र आत्मशक्ती असलेले तपस्वी,योगी जे त्यांच्या इच्छेनुसार शरीराचा त्याग करतात.**


**हिंदू धर्मानुसार पुनर्जन्म हि एक संकल्पना आहे. यात मृत व्यक्तीचे त्याने मनुष्यरूपी योनीत केलेल्या कर्मानुसार त्याला इतर योनीत (अपवादात्मात स्थित मनुष्य सोडून) इतर जन्म मिळतो.यावर लेखकांनी अनेक लेख लिहिले आहेत.परंतु कोणत्याही लेखात आत्म्याचे खरे रूप सांगितले नाही.यातच पुढे स्वर्ग,नर्क ,जन्नत,जहन्नुम,हेवन,हेल हे देखील सांगितले आहे व आपल्या कल्पनेनुसार याचे वर्णन केले आहे. प्रत्येकाच्या मते स्वर्ग,नर्क ,जन्नत,जहन्नुम,हेवन,हेल हे पृथ्वीच्या वरती व खाली आहेत पण नेमके कोठे हे मात्र कोणीच लिहिले नाही.दुर पृथ्वीच्या वरती व खालती आकाशात कोठेतरी आहे असेच वर्णन आहे. या लेखात लेखकाने आत्मा म्हणजे नेमके काय व मृत्युनंतर त्याचे नेमके काय होते याचा लेखकाच्या तर्कानुसार**

सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आपले विश्व कसे निर्माण झाले,विश्वनिर्मितीपूर्वी काय होते,मनुष्य कसा निर्माण झाला व नंतर धर्म कसा अस्तित्वात आला हे देखील मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## विश्वाची निर्मिती

एका सर्वमान्य संकल्पनेनुसार विश्व हे १४.५ अब्ज वर्षांपूर्वी अस्तित्वात आलें. विश्व निर्माण होण्यापूर्वी अखंड ब्रह्मांड हे केवळ अंधाराने व्यापले होते. या विश्वात तेंव्हा केवळ अगदी बारीक म्हणजे अतिसुक्ष्म कां हे कृष्णपदार्थात (dark matter) स्वरूपात अस्तित्वात होते [१]. अस्तित्वात होते म्हणजे ते स्थिर नव्हते तर त्यांना एक दिशाहीन गती होती. कालांतराने या अब्जाविधी कणांना एकदिशेला सामुहिक गती मिळुन एकदिशेने एक प्रवाह निर्माण झाला. असेच या विश्वात अनेक ठिकाणी प्रवाह निर्माण होऊन ते इतरत्र फिरत होते. असेच एका क्षणी दोन विरुद्ध दिशेने येणारे प्रचंड प्रवाहाची एकमेकांशी टक्कर होऊन ज्यास्त ताकदवर प्रवाहाने कमी ताकदीच्या प्रवाहाला कमकुवत (*दाबून टाकले* )करून याचे रूपांतर एका महाप्रचंड भोवऱ्यात झाले ज्याला आपण ब्रह्मांडीय भोवरा म्हणू. जसे नदी,महासागरात,हवेत भोवरे निर्माण होतात अगदी तसेच या कृष्णपदार्थांच्या सोबत घडले असावे. भोवऱ्यांचा एक गुणधर्म आहे कि ज्या ज्या वस्तू यात जातात अगदी त्याच प्रमाणात त्याच वातावरणात दूर कोठेतरी एका छोट्याशा भागातून बाहेर फेकल्या जातात (*जसे भोवऱ्यांनी समुद्राचे पाणी कधीच कमी अथवा ज्यास्त होत नाही,हवा देखील कमी होत नाही परंतु त्या भागात त्या वस्तूचा दाब काही काळासाठी कमी होतो.).*

ज्याक्षणी विश्वनिर्मिती(महाविस्फोट)झाली त्याच क्षणी प्रकाश आणि अवकाशाचीसुरुवात झाली.आतील कृष्णपदार्थ वेगाने भोवऱ्याबाहेर एकाठिकाणी प्रवाहरूपाने (वायुस्वरूपात )अवकाशात फेकले गेले. आकृती क्र.२ नुसार.



अ) समुद्री भोवरे ब ) अवकाशीय भोवरे क ) विश्वनिर्मिती होतांना क्षण


आकृती क्र.१ सागरी व अवकाशीय भोवरे आणि कृष्णपदार्थातून विश्वनिर्मिती




आकृती क्र.२

**सुरवातीला अवकाशाचे तापमान जवळपास $१०^{३५}$ केल्विन होते ते नंतर कमी होत गेले.असे होत असतांनाच कृष्णपदार्थाचे जड वायुतुन (हैड्रोजन ते हेलियम,नायट्रोजन वैगरे हलक्या वायूत रूपांतरित होत गेले. अब्जाविधी वर्षानंतर या क्रियेत प्रथम वायूंचे ढग बनले,जेथे ढगांचे वस्तुमान ज्यास्ती त्याला घन भारित व तुलनात्मक कमी वस्तुमान असलेल्यांना ऋण भारित म्हटले गेले.घन आणि ऋण ढगांचे आकर्षण होऊन पुढे ग्रह,निहारिक,निहारिका,आकाशगंगा निर्माण झाल्या. थोडक्यात हे आकृती क्र. ३ नुसार दाखविण्यात येईल.**

वायूरूप —> प्लाझ्मा —> द्रवरूप —> घनरूप




आकृती क्र. ३ विश्वाची निर्मिती

# एकपेशीय जीवापासून ते मानवाच्या निर्मिती पर्यंत


**विश्वनिर्मितीच्या वेळी ब्रह्मांडीया वातावरण अतिशय तप्त व गुंतागुतीचे होते. अनके प्रकारचे वायू,आम्ले,वेगवेगळ्या पदार्थींचे होणाऱ्याअनोन्यक्रिया (interaction) त्यातून निर्माण होणारे पदार्थ,अनेक छोटे घनसमूह मिळून निर्माण होणारे ग्रह,तारे,घर्षणाने तयार होणाऱ्या वीजा,वादळं अशा अनेक घटना घडत होत्या. अशातच दुर एखादया ग्रहावर सतत बदलणाऱ्या वातावरणाने (आम्ल,इतर माहित नसलेले वायू आणि आणखीन काही) मुळे एखादी अतिसूक्ष्म रचना तयार झाली**

असावी व त्या अतिशय तप्त वातावरणातच त्यात एक संवेदना(आत्मा/जिव) निर्माण झाली असावी आणि एकपेशीय जिव निर्माण झाला असावा.कोश(आवरण) नसलेला हा एकपेशीय जीव म्हणजे पुर्वज (pro generator ) प्रोक्यारॉटिक्स (prokarytic) म्हणजे कोश (आवरण) आणि केंद्रक (nucleus )नसलेला उदा. जिवाणू (bacteria ) अमिबा युक्यारॉटिक्स म्हणजे कोश (आवरण)आणि केंद्रक (nucleus )असलेला असलेला उदा.अदिवासीसंघ (protozoa)सुक्ष्म प्राणी,शेवाळ इत्यादी.

जर प्रोक्यारॉटिक्स (prokarytic) ला समजण्याचा प्रयत्न केला तर अमिबा हे उदाहरण घेता येईल.अमिबा एक जिवाणू असून तो कोठेहींहि सापडू शकतो जसे पाण्यात,हवेत वगैरे.याला निश्चित असा कुठलाच आकार नसतो तसेच याच्या पासुनच दुसऱ्या अमीबाची निर्मिती (reproduction) होते. आकृती क्र.४ व ५.



४:अनियंत्रित वाद झालेले जिव





५ अमिबा व पुनर्रउत्पादन

या एकपेशीय जंतू पासूनच पुढे अनेक पेशीय (बहुपेशीय) जंतुंची निर्मिती झाली कारण एकपेशी पासुन अनियंत्रित आकाराने कुठल्याच क्रिया साध्य होत नव्हत्या जसे अन्न स्वास घेणे वगैरे. याकरिता अनेक पेशी एक होऊन विविध भागात त्यांच्या कार्यानुरूप वाटले गेले. जसे स्वशन,अन्न घेणेइत्यादी. अनेक पेशीय (बहुपेशीय) जंतुत मुख्य भाग म्हणजे केंद्रक असते जे शरीराच्या सर्व प्रक्रिया नियंत्रित करते. उदाहरणार्थ चयापचय,शरीराची वाढ ई. आकृती क्र .६ मध्ये अनेकपेशी(बहुपेशीय) जंतूची रचना दाखविली आहे.




आकृती क्र .६ : अनेकपेशी(बहूपेशीय) जंतूची रचना

**केंद्रकाला निश्चित असे माहित नसल्याने विविध आणि विचित्र आकाराचे बहुपेशीय प्राणी तयार झाले असावे.नंतर केंद्रकाची रचना आजच्या मेंदूत होऊन आजचा मनुष्यप्राणी तयार झाला असावा.**



आकृती७:विचित्र आकाराचे प्राणी

**मेंदू म्हणजे काय तर अनेक पेशींनी मिळून बनलेला काहीतरी निश्चित योजना असलेला पेशी समुह. निश्चित योजना त्यात कोठून आल्या असाव्यात?**
**तर पहिल्या योजनेत आलेल्या अडचणींना समजुन दुसऱ्या अधिक चांगल्या योजना तयार करणारा पेशी समुह.अडचणी कशा समजणार तर मेंदूत असलेल्या अनेक पेशींमधील काही पेशीत अडचणी साठवुन ठेऊन अधिक सोयीस्कर योजना तयार करणारापेशी समुह.याच समूहाला आता बुद्धी संबोधण्यात येते. या नुसारच पुढे अनेक रासायनिक,जैविक इतर द्रव्य मिळून पुढे हाडं,सांधा,स्नायु ,मांसपेशी,रक्त वगैरे भाग निर्माण होउन सोयीनुसार त्यात पाहण्या,बोलण्या,ऐकण्या नुसार क्षेपक (सेन्सर्स) बनले असावे. अशा रीतीने आदिमानवापासून ते आजच्या मनुष्यापर्यंतचा प्रवास झाला असावा आणि याला करोडो वर्षाचा काळ लोटला असावा.**



आकृती.८.आदीमानव ते आजचा मानव

**असेच कोठेतरी एखाद्या ग्रहावर घडले असावे जेथे बहुदा पहिले जिवसृष्टी निर्माण झाली. विचित्र आकाराचा प्राणी अशाच गोंधळाच्या वातावरणात निर्माण झाल्याने**


त्याने निसर्गाची सर्व शक्ती आत्मसात केली असावी जसे पर्जन्यासाठी,अग्निनिर्माण होण्यासाठी लागणारे वातावरण, स्वतःचा आकार कमी ज्यास्त करण्यासाठी,अदृश्य होण्याचे ज्ञान वगैरे या त्याला निसर्गातच मिळाल्या असाव्या व याच कालांतराने सिद्धी म्हणून गणल्या गेल्या असाव्यात. अशातच त्याने एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर फिरायचे मार्ग केवळ जिज्ञासेमुळे शोधले असावे. कदाचित निसर्गाच्या साह्याने,विचित्र आकारात किंवा कसे तरी.

## धर्माची निर्मिती ते मोक्ष

मनुष्य(आदिमानव) जेव्हा या भूतलावर आला तेंव्हा फक्त शिकार करू जगणे आणि रात्री विश्रांती घेणे हाच त्याचा क्रम होता.कालांतराने तो समुहात राहू लागला. अधिक सुधारित झाल्यावर त्याने शिकार सोडुन कंद,फळ खाणे सुरु केले. अशातच योगायोगाने वरती लिहल्याप्रमाणे पूर्वी निर्माण झालेले मानव पृथ्वीवर आले असावे. येथील मानवात राहून त्याने त्याला योग्य राहणे शिकवले असावे,यातील स्त्रियांशी मिलन होऊन नवी सुधारित पिढी घडविली असावी व निघून गेले असावे.अधिक प्रगल्भ झाल्यावर या नंतर त्यांचा समाज बनला.या समाजाने काही नियम निर्माण केले व या नियमातुनच पुढे संस्कृतीचा उगम झाला.त्यालाच आपण हिंदू संस्कृती असे म्हणू लागलो. या समाजालाच पुढे धर्म हे नाव दिल्या गेले.तेव्हा सर्व प्रथम हिंदू धर्म तयार झाला.या धर्माचा उगम आजपयंत कोणालाच समजली नाही किंवा सांगता येत नाही केवळ तर्कानेच याचे योग्य उत्तर मिळने शक्य आहे.म्हणुनच हा अतिप्राचीन पहीला धर्म आहे.या धर्माचे नियम काही मनुष्यांना मान्य नव्हते म्हणुन पाप आणि पुण्य या कल्पनेची निर्मीती झाली.जर समाजाच्या नियमाच्या विरुद्ध वागले तर पाप केले असे मानले गेले असावे आणि जे धर्माच्या नियमानुसार कार्य करीत राहिले ते पुण्यवान ठरले असावे. यातच मग समाजाला काही धाक असावा म्हणुन काल्पनिक इश्वर (वर सांगितल्याप्रमाणे ) निर्माण केला असावा. त्यालाच आपण देव असे म्हणतो कारण ते आकाशातून आले होते व आकाशातच अंतर्धन पावले. त्यांनी परत यावे म्हणुन येथील लोकांनी त्यांची चित्रे रेखाटली असावी,मोठमोठे स्मारके तयार केले असावे. या धर्मातच ४ युगे सांगितलेली आहेत म्हणजे सत्ययुग,द्वापार,त्रेतायुग आणि कलियुग.ज्यांनी खूप पाप केले म्हणून मुक्ती मिळावी या साठी मोक्ष हि संकल्पना रूढ झाली असावी. मोक्ष मिळवण्यासाठी त्याने स्वतःच्या शरीराला नीरनिराळ्या प्रकारे वेदना,उपवास,जप,तप, यज्ञ हे प्रकार सुरु केले असावे. या मागचा उद्देश एवढाच कि मनाला शांती मिळावी आणि असे प्रत्येक धर्मात आहे.त्यांच्या पैकी काही परत आले असावे परंतु मनुष्य अवतारात नैसर्गिक अशी शक्ती घेऊनच.हि शक्ती त्यांनी फक्त आणीबाणीच्या परिस्थितीतच वापरली असावी.


येथे आता मनाचा उल्लेख आला आहे तर मन म्हणजे काय? निसर्गतः माणसाला मेंदू व मेंदूला गोंधळ करणारे मन निर्माण असावे.मेंदू हा त्याच्या बुद्धी नुसार काम करतो

तर मन हे बाहेरील परिस्थितीचा विचार करून मनाला कळविते. म्हणजेच जाणीव (आत्मा) हा दोन विभागात वाटल्या गेलेला आहे, एक बुद्धी आणि दुसरा मन. बुद्धी किंवा मन यापैकी कोणाचा जरी निर्णय चुकला तर तो आत्म्याला क्लेशदायक ठरतो.




आत्मा

मुळात आत्मा म्हणजे काय? आणि तो शरीरात कुठे असतो? या विषयी पहिले जाणून घेऊ या. कुठल्याही प्राण्याचे जीवंत असण्याचे लक्षण म्हणजे त्याच्या शरीरातील आत्मा अन्यथा नसल्यास तो मृत असतो. आत्म्याचा वास शरीरात नेमका कोठे असतो ? अनेक तर्कवितर्क या बाबत केलेले आहेत. काहींच्या मते तो हृदयात असतो,काहींच्या नुसार तो मस्तकात असतो तर काहींच्या मते तो संपुर्ण विश्वात आहे. माझ्या मते आत्मा हि एक जाणीव आहे जी मनुष्याच्या शरीरात प्रत्येक भागात आहे. जसे हातापायाला काही टोचले तर ताबडतोब
जाणीव होते व तेथे क्षणात लक्ष जाते,याचाच अर्थ हि संवेदना शरीरातील प्रत्येक भाग व्यापून आहे.
दुसरे म्हणजे आत्मा हि एक जैविक शक्ती आहे जी इतर शक्तीप्रमाणे कोणालाही दिसत नाही.या शक्तीला उर्ज (नैसर्गिक ताकद)व असे म्हणतात.आता ऊर्जेच्या नियमाप्रमाणे ती बनवताही येत नाही किंवा नष्टदेखील करता येत नाही परंतु तीला एका रूपातून दुसऱ्या रूपात आणता येते.तर मनात विचार येतो कि मृत्यूनंतर हि शक्ती कशात बदलते. आत्मा हि जैविक(सजीवांची)शक्ती आहे व ती फक्त इतर सजीव जीवात जातांना त्या सजीवाचे फक्त शारीररक रूप बदललेले असते व हि शक्ती त्या शरीरात प्रवेश करते.मुक्त रूपात या शक्तीला काहीच आकार नसतो तर तो प्राप्त होतो जेव्हा तो ते रूप धारण करतो.कुठल्याही सजीवाचे शरीर हे म्हणजे हा केवळ सांगाडा आहे तसेच आत्म्याने ने धारण केलेले एक बाह्य आवरण आहे.
आत्म्याचा प्रवास हा प्राण्याच्या जन्मापासून सुरु होतो तो त्याच्या मरणापयंत राहतो. कुठल्याच प्राण्याला त्याच्या मरणाचा वेळ,कालावधी सांगता येत नाही व तसेच आत्म्याचा शरीरात प्रवेश देखील सांगता येत नाही.थोडक्यात खाली दाखववल्या प्रमाणे सांगता येईल.




मनुष्याचा अंत  होतो म्हणजे आत्मा शरीरापासून मुक्त होतो.याचाच अर्थ जी जैविक शक्ती आहे ती शरीरातुन निघून जाते.कोठे तर अवकाशात विलीन होते.हे जगात झालेल्या अनेक प्रयोगाने सिद्ध झाले आहे.परंतु ती दिसत कोणालाच नाही.काही लोक यावर विश्वास ठेवत नाहीत तर हेच लोक वाहणारी हवा का पाहू शकत नाहीत,आग दिसते म्हणून ती आहे पण हेच लोक आगीच्या झळा का पाहू शकत नाही याच झळा फक्त अंगाला लागतात म्हणून त्या आहेत असे मानतात. कारण हे लोक विज्ञानवादी आहेत.जे डोळ्याने दिसते त्यावरच हे विसावस ठेवतात. मुळात विज्ञान हेच ज्ञानावर आधारित आहे. सर्वात पहिले ज्ञान नंतर विज्ञानाचा उगम झाला.मनुष्याला निसर्गतःप्राप्त झालेल्या क्षेपकाच्या (सेन्सर्स) च्या मर्यादेपेक्षा हे पुढे काहीच समजू शकत नाहीत. क्षेपकांच्या मर्यादेपेक्षा कमी व मर्यादेपलीकडे पाहू शक्ती अस्तित्वात आहेत याची जाणीवच यांना होत नाही म्हणूनच हे असे क्षेपक कृत्रिमरीत्या तयार करतात व नंतर आपल्याला सांगतात. या उलट अनके पशुपक्ष्यांना हि जाणीव निसर्गतः प्राप्त असते व ते प्रसंगीदर्शवितात देखील.काही मनुष्यांना अश्या शक्ती निसर्गतःजाणवतात असे जगात अनके ठिकाणी दिसुन(समजून)आले आहे. शक्ती जाणवतात म्हणजेच यांना या शक्ती शरीरविहीन रूपात दिसतात.यालाच भुत असे सध्या भाषेत म्हटले जाते. यांचे अस्तित्व निश्चित शरीरविहीन रूपात अनंतात असते. फक्त मनुष्याला ती जाणीव निसर्गतःहे प्राप्त झाली पाहिजे.थोडक्यात असे म्हणायचे आहे कि मुळात न दिसणाऱ्या शक्तीचे अस्तित्व हा विषय ज्ञान आणि विज्ञानवादी लोकांच्यावर अवलंबून आहे. .ज्यांना या शक्ती जाणवतात ते यावर विश्वास ठेवतात ज्यांना नाही जाणवत ते विश्वास ठेवत नाहीत. हाच नियम पुढे आस्तिक आणि नास्तिक,श्रद्धा आणि अंधश्रद्धा लागू होतो.


या लेखातच पाप आणि पुण्य हा विषय लिहला आहे तसेच मोक्षाची कल्पना सुद्धा मांडली आहे.


संत,माहात्म्यांनीच पाप,पुण्य,मोक्ष या कल्पना मांडल्या ज्या सर्व धर्मात थोडयाफार फरकाने सारख्याच आहेत.जर मनुष्याला स्वर्गात जागा मीळवायची असेल,मोक्ष समळवायचा असेल तर त्याने समाजात कसे वागावे हे सांगितले. 'चित्रगुप्त' जो प्रत्येक प्राणीमात्राचा लेखाजोखा ठेवतो हि कल्पना देखील त्यांचीच.ह्या सर्व कल्पना याच्यासाठीच कि कोणीच ह्या गोष्टी स्वतःच्या डोळ्याने पहिल्या नाही पण विश्वास मात्र ठेवला.म्हणुनच मनुष्य हा मृत्यूनंतर स्वर्ग,मृत्यू किंवा पाताळ मिळविण्याच्या  मनीषेने पृथ्वीवर आपले कार्य  करीत असतो.

सर्वात पहिले म्हणजे हि सर्व कर्तव्य भूतलावर असतांनाच का करावी लागतात तर भूतलावर असणाऱ्या एकूण चौऱ्यांशी लक्ष योनीतुन फक्त मनुष्य हि एकच योनी अशी आहे कि ज्याला विचार करण्याची शक्ती आहे.त्यालाच इतर योन्यांच्या तुलनेत प्रगल्भ असा मेंदू आहे.त्याचा मेंदुत जन्मल्यावर काहीच माहिती साठवलेली नसते परंतू जसा जसा मनुष्य वयाने वाढतो तशी तशी त्याच्या मेंदूची शक्ती एका ठराविक वयापयंत वाढते.या वेळी तो विचार करायला लागतो,चांगले-वाईट या बद्धल त्याला जाण येते व तो आपले व तो त्यानुसार वागायला लागतो.


आतापयंत लिहीलेल्या नुसार एक गोष्ट नक्की कि मृत्यूनंतर आत्म्याला एक तर उध्ववगामी(वरती.,स्वर्ग),अधोगामी(खाली,पाताळ) अथवा भुतालावरच कुठल्याही एका जीवात प्रवेश करावा लागेल. समजा जिवंतपणी(भुतलावरअसतांना)मनुष्याने चांगली कामे केली असेल किवा काही मिळववण्याकरीता निश्चयाने तपश्चर्या,जप-तप,दृढविश्वास,शुद्ध आचरण वैगरे केले असेल तर तो शुद्ध होऊन त्याला एकप्रकारचे तेज प्राप्त होते.हा तेजस्वी आत्माचतीव्र उर्ध्वगमी दाबाने आकृतीत(क्र.९)दाखववल्याप्रमाणे वर जागा व्यापतो. समजा जिवंतपणे मनुष्याने वाईट कामे केले असतील,आपले इप्सित साधण्याकरता त्याने सिद्धी ,मंत्र,तंत्र,दुष्टशक्ती,अघोरीविद्या यांचा उपयोग केला असेल तर त्याचा आत्मा तेजस्वी असला तरी तो अधोगामी जातो.

जमिनीपासून जसे वर वर जावे तसे वातावरण विरळ होत जाते. वातावरण हे अनेक वायुंनी बनलेले असते. वायू हि देखील एकप्रकारची अनेक प्रकारच्या वायूंची तयार झालेली शक्तीच आहे. जमिनीजवळ वायूचा दाब हा ज्यास्त असतो तर वर हा कमी कमी होत जातो आणि मनुष्याने चांगले,वाईट हि कामे सारखीच केली असतील तर तो येथेच भुतलावरच अनेक योन्यांतुन फिरत राहतो आकृती १०.




आकृती क्र.९



आकृती १०:अवशकीय थर

**मनुष्याने चांगले,वाईट हि कामे सारखीच केली असतील तर तो येथेच भुतलावरच अनेक योन्यांतुन फिरत राहतो. आकृती क्र.९ मध्ये जागा दाखविल्या आहेत.आपल्या कर्मा प्रमाणे आत्मा त्या त्या लोकात आपले स्थान व्यापतो म्हणजे त्या त्या वातावरणातील थरात मिसळून जातो.**

**चर्चा**

**मुळातच मोक्ष मिळणे (मिळविणे) म्हणजे नेमके काय?हा विषय अध्यात्मिक विषयाशी निगडित असुन लेखकाने केवळ तर्कबुद्धीने याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. तर्कबुद्धी,कल्पनाशक्ती,विचार करणे वगैरे शक्ती या माणसाच्या मेंदुतच समाविष्ट आहेत व आपल्या कुवती(शक्ती)नुसार त्या मनुष्याच्या लाभतात. अणिमा (सुक्ष्म रूप धारण करणे),महिमा(रूप धारण करणे),लघिमा(लघु रूपात हवेपेक्षा वेगाने उडणे),गरिमा(अतिशय जड शरीर बनवणे), प्राप्ति (कोठल्याही अडथळ्याविना कोठे जात येणे),प्रकाम्य(दुसऱ्याच्या मनातलं ओळखणे)ईशत्व(इश्वर रुप धारण करणे), वशित्व(कोठल्याही व्यक्तीला दास बनवणे) या त्या ८ प्रकारच्या सिद्धी होत. या केवळ रामायणानुसार हनुमानालाच निसर्गतः प्राप्त होत्या.बाकीच्या शक्ती या केवळ देवांपासून माणसाला प्राप्त होतात कारण देवांजवळच या शक्ती निसर्गतः असतात.**

**प्र.मुस्लिम व ख्रिश्चन धर्मात मोक्ष हा शब्द आहे काय?**

**ऊ.नाही कारण दोन्ही धर्मात मनुष्याला दफन करतात.एकदा मनुष्य गेला कि तो परत जन्म घेत नाही हीच त्यांची संकल्पना आहे. तो एक तर जन्नत मध्ये अथवा जहन्नुम मध्ये जातो. त्यांच्यात 'कयामत का दिन' नुसार एकच इश्वर आहे व तो त्याच्या निर्णयानुसार मनुष्याला जन्नत अथवा जहन्नुम मध्ये पाठवितो.ख्रिश्चन धर्मानुसार 'judgement day ' हा शब्द प्रचलित आहे. येथे हेवन अथवा हेल मध्ये मनुष्य जातो.**

प्र.हिंदू धर्मानुसार पुनर्जन्म हा खरोखर होतो काय कि केवळ एक मनाची कल्पना आहे?


ऊ.आत्मा हि एक जैविक शक्ती आहे हे सिद्ध झाले आहे.शक्ती म्हणजेच ऊर्जा व ऊर्जा कधीच नष्ट हो नाही तर ती एका रूपातून दुसऱ्या रूपात जाते. उल्लेखलेल्या ८४ लक्ष योनीत ती नक्कीच प्रवेश करीत असावी.म्हणजेच पुनर्जन्म हा नक्कीच आहे पण तो नक्की कोणत्या योनीत हे सांगणे कठीण आहे.हि एक मनाची कल्पना  नाही.

प्र.ब्रह्मदेवाची निर्मिती कशी झाली?देव खरोखरच आहेत काय?

ऊ. :ब्रम्ह म्हणजे विश्वाच्या उगमातुन ((महाविस्फटातून) सर्वात पहिले बाहेर पडलेली शक्ती (आकृती २) असावी ज्या शक्तीतून इतर अनके शक्ती कालांतराने निर्माण झाल्या. महाविस्फटानंतर काही क्षण शांतता होती नंतर प्रसारण होत गेले.या नंतर काही शक्तीं केवळ आहे त्याच रूपात राहिल्या तर काहींचे इतर शक्तीची मिलन होऊन एक तर त्या नष्ट झाल्या असाव्या.म्हणुनच प्रथम निर्माण झालेल्या शक्तीला ब्रम्हा,शांततेच्या वेळात निर्माण झालेल्यात्याच रूपात राहिलेल्य  शक्तीला विष्णु व ज्या शक्तीमुळे इतर काही शक्ती नष्ट झाल्या त्या शक्तीला महेश असे म्हटले असावे.

प्र. प्र. संपुर्ण ब्रह्मांड हे काय आहे?असे अनेक ब्रह्मांड आहेत काय?

ऊ.ब्रह्मांड हे कृष्णपदार्थातुन अपघाताने (महाविस्फोटाने) निर्माण झालेली अमर्याद पोकळी आहे जिचा विस्तार क्षणोक्षणी सुरूच आहे.माझ्या मते अशा अमर्याद कृष्णपदार्थ्यांच्या सीमेत अनेक ब्रह्मांड निर्माण होणे शक्य आहेत. आकृती ११.



आकृती ११.

प्र. देव म्हणजे कोण?ते खरोखरच अस्तित्वात आहेत काय?

उ. देव हि केवळ एक संकल्पना नसुन मनुष्य जेंव्हा थोडा बहुत सुधारलेला समुहाने राहणार   होता तेव्हा काही अतिपुढारलेले प्राणी आकाशातून पृथ्वीवर आले असावे.त्यांनीच येथील लोकांना काही सामाजिक नियम शिकवले असावे व येथील स्त्रियांशी समागम करून पुढची पिढी सुसंकृत घडविली असावी. ते आकाशातुन आले व आकाशात निघून गेले म्हणून येथील लोकांनी त्यांना देव अशी संज्ञा दिली असावी.(या बद्धल सविस्तर माहिती 'देव छे! अंतराळातील परग्रहवासी' हे सुरेशचंद्र

नाडकर्णी लिखित पुस्तकात मिळू  शकेल.) तसेच डॉ.पि.व्ही.वर्तक लिखित 'वास्तव रामायण' मध्ये देखील 'देव'  हा एक वंश सांगितला आहे.

प्र.मोक्ष खरोखर अस्तित्वात आहे काय?

उ. मोक्ष म्हणजे अतिशय विरळ वायुत पुन्हा कधीही  पृथ्वीवर न येणे म्हणजेच मुक्ती मिळविणेहा होय आणि विरळ हवा हि केवळ अतिशय उंच ठिकाणीच असते म्हणजेच मोक्ष हा असतो.

प्र. युग म्हणजे काय? असे किती युग आहेत?कुठले देव कोणत्या युगातले आहेत.?

उ.ऋग्वेदात ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे एक युग सांगितले आहे. युग म्हणजे निर्मिती,उत्कर्षाला पोहचणे व नष्ट  होणे हि प्रक्रिया. या प्रक्रियेत एकूण चार युग सांगितले आहेत.सत्ययुग,द्वापारयुग,त्रेतायुग आणि कलीयुग.या चारही युगांना जोडणारा एक संधीकाळ म्हणजे अतिशय छोटा काळ. (जसे दिवस संपुन रात्रीपर्यंतचा मधला काळ.) सर्वात पहिले ब्रम्हदेवाची(शक्ती)निर्मिती झाली त्यानेच विष्णू व महेश असे दोन देव(शक्ती)निर्माण केल्या व विष्णूनेच दशावतार घेऊन आतापर्यंत माहित असलेल्या युगात विविध रूपाने अवतार घेऊन संचार  केला.

प्र.पुर्वीचे ऋषी,मुनी,आचार्य,तपस्वी हो कोण होते?.आताचे विद्यावाचस्पती (Ph.D.),विद्यापारंगत(मास्टर्स),स्नातक(बॅचलर्स) यात काही साम्य आहे काय?असल्यास कोणते?

उ. पूर्वीच्या ऋषी,मुनी,आचार्य,तपस्वी यांनी आप,तेज,जल,अग्नी,वायु या पाच तत्वांचा अभ्यास (तप) करुन त्यांना कोठल्याही प्रकारे वापरणाच्या विद्येत प्रभुत्व (ज्ञान )मिळवले होते.ते तत्वज्ञानी होते. आताचे विद्यावाचस्पती (Ph.D.),विद्या पारंगत (मास्टर्स),स्नातक (बॅचलर्स ) हे विज्ञानाच्या(कोठल्याही)विषयात ज्ञान मिळवून त्यात प्रभुत्व मिळवितात. तसे पहिले तर दोघात काहीही फरक नाही. त्यांनाही एकांत आवडत होता यांनाही एकांत आवडतो,ते रागीट/शीघ्रकोपी (बहुतांश) असायचे हे देखील असतात,तेही एखाद्या विषयात प्रभुत्व मिळवितात हे देखील तेच करतात. फक्त फरक एवढाच कि त्यांनी तत्वज्ञानात तर हे विज्ञानात (कोठल्याही) ज्ञान मिळवितात.

प्र. वाचण्यात आलेली अस्त्रे जसे पर्जन्यास्त्र ,अग्निअस्त्र ,वायूअस्त्र ,ब्रम्हास्त्र,त्रिशुल,सुदर्शन चक्र,वज्रास्त्र आणि इतर अस्तित्वात आहेत काय? आणि ते कसे मिळतात?

उ. होय अस्तित्वात आहेत. लेखात सांगितल्या प्रमाणे जेंव्हा विश्वनिर्मिती झाली तेंव्हाच्या  वातावरणत या सर्व विध्वंसक शक्ती निर्माण झाल्या.जेंव्हा पहिला एकपेशीय जिव निर्माण झाला तेंव्हाच त्याच्या मेंदूत या शक्ती कोरल्या (साठविल्या) गेल्या. कालांतराने जेव्हा या एकपेशीय जिवापासुन मनुष्य निर्माण झाला तेंव्हा याच मनुष्याने त्याच्या सुप्त मेंदुतुन या   जागृत केल्या व त्यांना नियमबद्ध करून प्राप्त

**केल्या. जसे ब्रम्हास्त्र फक्त ब्रह्मदेवच निर्माण करू शकत होते कारण ते पहिले निर्माण झाले.नंतर निर्माण होणारे विष्णू यांनी सुदर्शनचक्र,महेशाने त्रिशूल वगैरे निर्माण केले असावे.**

**प्र. सिद्धी आणि शक्ती यात फरक आहे काय?**

**उ. होय.सिद्धी या नैसर्गिकपणे त्या वातावरणातून जीवांना प्राप्त होतात तर शक्ती ह्या त्या देवांनी निसर्गातून मिळवल्या असतात व या त्या देवांची तपश्चर्या करूनच मिळवाव्या लागतात.**

***सुज्ञ वाचकहो शक्य तितक्या साहजिक मनात उठणाऱ्या शंकाना मी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.अजून काही शंका असल्यास लेखकाशी समक्ष भेटून शंकेचे निरसन करावे.***